ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष ३१ | पुणें, बुधवार, २१ एप्रिल, १९६५ | अंक ८

## विविध माहिती

**धान्य आयातीचा नवा करार**—अमेरिकेंतून धान्य आयात करण्यासाठी नवा करार करण्याच्या वाटाघाटी सध्यां चालू आहेत. भारताच्या येत्या दोन वर्षांतील गरजा भागविण्याच्या दृष्टीनें कराराची आंखणी करण्यांत आलेल्या करारापेक्षा नव्या कराराप्रमाणें अधिक धान्याची आयात होणार असून त्याचा मुख्य उपयोग राखीव सांठा करण्यासाठीं होणार आहे.

**संयुक्त औद्योगिक संघटना**—ऑस्ट्रेलिआंतील उद्योगधंदेवाल्यांचें एक प्रतिनिधिमंडळ लवकरच भारताच्या दौऱ्यावर येणार आहे. भारतामधील उद्योगपतींशीं सहकार्य करून भारताच्या विकास कार्यांत भाग घेण्याची शक्यता अजमावण्याचा प्रयत्न मंडळ करील. शेती, लोहेतर धातु, अन्नपदार्थ संस्कारित करण्याचीं साधनें इत्यादि बाबतींत ऑस्ट्रेलिया भारताला चांगलें साह्य करूं शकेल.

**लंडनमधील संगीताची मैफल**—येत्या सप्टेंबर महिन्यांत कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांतील कलावंतांची एक मैफल भरविण्यांत येणार आहे. ह्या मैफलींत भाग घेण्यासाठीं भारतामधून तीन संगीत कलावंत आणि १४ कथकली नृत्य कलावंत जाणार आहेत. सतारवादक रविशंकर आणि सनई वाजविणारे बिस्मिल्लाखान ह्यांचा समावेश करण्यांत आला आहे.

**उटकमंड येथील फिल्मचा कारखाना**—उटकमंड येथें सिनेमाला व फोटोसाठीं लागणाऱ्या फिल्मचा कारखाना काढण्यांत येत आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं एका फ्रेंच कंपनीचें सहकार्य घेण्यांत आलेलें आहे. उभारणी पुरी होत आली असून १९६५-६६ मध्यें प्रत्यक्ष उत्पादनास आरंभ होईल. क्ष-किरण चित्रासाठीं लागणारी फिल्महि कारखान्यांत तयार करण्यांत येईल.

**वर्णभेद पीडितांना मदत**—दक्षिण आफ्रिकेंतील वर्णभेदाच्या धोरणामुळें पिडलेल्या लोकांना साह्य करण्यासाठीं एक आंतरराष्ट्रीय निधि उभाण्यांत आलेला आहे. निधीमार्फत १९५८ पासून ३ लाख ७० हजार पौंड रकमेची मदत देण्यांत आली आहे. ह्या निधीला स्वीडननें २७,५०० पौंड व भारतानें २००० पौंड मदत केली आहे, अधिकाधिक देशांकडून निधीला पाठिंबा मिळत आहे.

**दारिद्र्याविरुद्ध अमेरिकेचा लढा**—अमेरिकेंतील दारिद्र्यांत जीवन कंठणाऱ्या लोकांना मदत करण्यासाठीं एक कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. १८२ परगण्यांतील २५ लाख लोकांना अशा मदतीची गरज आहे. ज्या परगण्यांतील दरडोई वार्षिक सगमगी उत्पन्न ७५० डॉलर्सपेक्षा कमी असेल त्यालाच मदत मिळण्याचा हक्क आहे. अमेरिकेंतील दरडोई वार्षिक उत्पन्नाची सगमगी १,८५० डॉलर्स आहे.

**कॅनडाकडून मदत मिळणार**—खनिज धातूंचा शोध लावण्याच्या भारताच्या कार्यक्रमास मदत म्हणून कॅनडाकडून ४ कोटी रुपये किंमतीचीं साधनें मिळण्याची शक्यता आहे. भारताच्या भूगर्भ संशोधन खात्यानें व खाणी खात्यानें ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत संशोधनाचा ३० कोटी रुपये खर्च येणारा कार्यक्रम आंखला आहे. त्यापैकीं ६ कोटी रुपयांचा खर्च परदेशीय चलनांत करावा लागणार आहे.

**न्यायाला वंचित झालेली फ्रेंच स्त्री**—पश्चिम युरोपांतील अनेक देशांतील स्त्रियांपेक्षा फ्रेंच स्त्री अद्यापहि पुरुषनिर्मित बंधनांत आहे. ह्या बंधनांतून तिला सोडविण्यासाठीं फ्रेंच सरकार लवकरच एक कायदा करणार आहे. ह्या कायद्यांतील कांहीं तपशील आतां कळला आहे. सध्यांच्या फ्रेंच कायद्याप्रमाणें फ्रेंच स्त्री ही पुरुषाची म्हणजेच तिच्या पतीची जवळजवळ गुलामच असते. तिला नोकरी करावयाची तर प्रथम नवऱ्याची संमति मिळवावी लागते. तिच्या स्वतःच्या उत्पन्नाची विल्हेवाट लावण्यासाठीं, फार काय पण बँकेंत स्वतःचें स्वतंत्र खातें उघडण्यासाठींहि तिला पतिराजांची अनुमति घ्यावी लागते. नवा कायदा अमलांत आल्यावर ह्या सर्व गोष्टी तिला पतीच्या परवानगीशिवाय करतां येतील.

**प्रत्येक राज्यांत नमुनेदार शेतें**—भारतामधील प्रत्येक राज्यांत एकेक नमुनेदार मोठें शेत उभारण्याची तयारी रशिआनें दाखविली आहे. ह्या सर्व शेतवाड्या राजस्थानांतील सुरतगढ येथील प्रचंड शेतवाडीपेक्षाहि मोठ्या असतील. शेतवाड्यांसाठीं लागणारीं यांत्रिक साधनें, तांत्रिक व इतर माहिती पुरविण्याचीहि तयारी दाखविण्यांत आली आहे. शेतवाड्यांचा सर्व कारभार चालविण्यासाठीं हिंदी लोकांची नियुक्ति करण्यांत येणार असून त्यांना शिकवून तयार करण्याचें कामहि रशिआ करणार आहे. भारत सरकारनें रशिआच्या ह्या योजनेचा स्वीकार केला, तर ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत संकल्पित शेतवाड्यांची उभारणी करण्याच्या कामाला हात घालण्यांत येण्याची शक्यता आहे.

**चीनमधील शेतीचें उत्पादन**—चीनमधील शेतीचें उत्पादन अजूनहि लोकसंख्येची गरज भागविण्याच्या दृष्टीनें अपुरें आहे. अशी माहिती अमेरिकेच्या शेतीखात्यानें प्रसिद्ध केली आहे. १९५७ मध्यें चीनमधील पीकपाणी गेल्या कांहीं वर्षांत सर्वांत चांगलें होतें. परंतु १९६४ सालीं पिकें चांगलीं येऊनसुद्धां तीं १९५७ च्या मानानें कमीच आहेत. खाजगी मालकीच्या शेतांवरील उत्पादन सामाजिक मालकीच्या शेतीवरील उत्पादनापेक्षा अधिक वाढलें आहे.

**भारताला स्वित्झरलंडची मदत**—स्वित्झरलंडच्या परदेशांना मदत करण्याच्या कार्यक्रमांत भारताला ४० लाख स्विस फ्रँक्सचा हिस्सा मिळाला आहे. महाराष्ट्रांतील पाटबंधाऱ्यांच्या कामासाठी लागणारा नोकरवर्ग शिकवून तयार करण्याचें काम ह्या रकमेंतून करण्यांत येणार आहे. ह्या शिक्षणकेंद्रानें केलेलें आतांपर्यंतचें काम समाधानकारक आहे. शेतीविषयक एका स्विस तज्ज्ञाची केंद्रांत नव्यानें नेमणूक करण्यांत यावयाची आहे. कॅथालिक मिशन्सच्या साह्यानें मदतीचा कार्यक्रम अमलांत आणण्यांत येत आहे.


**कर भरण्यासाठी कर्ज**—अमेरिकेचे अध्यक्ष मि. जॉन्सन ह्यांना दरसाल १ लाख डॉलर्स पगारापोटीं आणि ५० हजार डॉलर्स खर्चापोटीं मिळतात. पण, खुद्द त्यांनींच म्हटल्याप्रमाणें एका हातानें देण्यांत येणारें उत्पन्न दुसऱ्या हातानें काढून घेण्यांत येतें. त्यामुळें कर भरण्यासाठी त्यांना १ लाख डॉलर्स कर्ज काढावें लागलें. मि. जॉन्सन ह्यांची स्वतःची मालमत्ता ४० लाख डॉलर्सची आहे.

**छोट्या उद्योगधंद्यांची निर्यात**—छोट्या उद्योगधंद्यांतून उत्पादन करण्यांत येणाऱ्या मालाची निर्यात वाढविण्याचें प्रयत्न जारीनें करण्यांत येणार आहेत. भारत सरकारच्या सूचनेप्रमाणें स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ह्या कामासाठी छोट्या उद्योगधंद्यांना मदत देण्याची एक योजना तयार करीत आहे. ह्या उद्योगधंद्यांच्या मालाला परदेशीय गिऱ्हाईक पाहून देणें, मालाच्या वाहतुकीची सोय करणें, त्याची प्रतवारी ठरविणें, इत्यादि बाबतींत मदत देण्यांत येणार आहे.

**अहमदाबादमधील शेतकी प्रदर्शन**—अहमदाबाद येथें तिसरें राष्ट्रीय शेतकी प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनांत भारत–जर्मनी सहकार्याचा एक दिन पाळण्यांत आला. त्या निमित्तानें पश्चिम जर्मन सरकारच्या वतीनें विजेवर चालणारा एक नांगर गुजरात सरकारला देण्यांत आला. ह्या प्रसंगीं जर्मनीचे भारतामधील वकील म्हणाले कीं, भारतामधील शेतीवर करण्यांत येणाऱ्या कामाचें यांत्रिकीकरण करण्यांत आलें पाहिजे. त्यामुळें शेतीच्या उत्पादनांत वाढ होऊन भारत अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यास मदत होईल. शिवाय, सध्यां अन्नधान्याच्या आयातीवर होणाऱ्या परदेशीय चलनाच्या खर्चांतहि बचत होऊं लागेल.

**सहकारी साखर कारखान्यांतील उत्पादन**—१ नोव्हेंबर १९६४ पासून १५ मार्च १९६५ पर्यंतच्या कालांत ५० सहकारी साखर कारखान्यांनीं मिळून ५·५८ लाख टन साखर निर्माण केली. गेल्या हंगामांतील ह्याच कालखंडांत ४५ सहकारी कारखान्यांनीं मिळून ४·८० लाख टन साखर तयार केली होती. ह्याच कालखंडांत चालू हंगामांत १४९ खाजगी साखर कारखान्यांनीं १७·७७ व पूर्वीच्या हंगामांत १६·६८ लाख टन साखर उत्पादन केली.

**कोळशाच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण**—खाण-मालक संघटनेची ३२ वी वार्षिक सभा धनबाद येथें भरली होती. सभेचे मुख्य पाहुणे म्हणून भाषण करतांना नियोजन समितीचे उपाध्यक्ष श्री. अशोक मेहता म्हणाले कीं, कोळशाच्या खाणीचे प्रश्न विशिष्ट स्वरूपाचे असल्यामुळें ह्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करणें इष्ट ठरेल. खाणींच्या एकत्रीकरणामुळें त्या चालविण्यांतील अडचणी निवारण करणें सोपें होईल.



# अर्थ

बुधवार, २१ एप्रिल, १९६५



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## राहत्या जागांच्या टंचाईचें स्वरूप

मध्यवर्ती सरकारच्या घर आणि बांधकाम खात्याच्या वार्षिक अहवालांत दिलेल्या माहितीवरून देशांत राहण्याच्या जागांची किती विलक्षण टंचाई आहे तें लक्षांत येतें. अहवालांत ग्रथित केल्याप्रमाणें ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या प्रारंभीं ७ कोटी, ४१ लाख घरांची टंचाई भासणार आहे. त्यांतील ६ कोटी, २७ लाख घरांची गरज ग्रामीण भागांतील लोकांची आहे. गेल्या कित्येक वर्षांत घरांची बांधणी मंदगतीनें चालली आहे त्याचा हा परिणाम आहे. घरें बांधण्यासाठी सामाजिक स्वरूपाच्या ज्या योजना तयार करण्यांत आल्या त्यांच्या पोटीं आतांपर्यंत ३ लाख, ४७ हजार घरें बांधण्यांत आलीं. औद्योगिक घरबांधणी योजनेप्रमाणें गेल्या वर्षीच्या मार्चअखेर १ लाख, ४५ हजार घरें बांधण्यांत आलीं. ह्या योजनेंत घरें बांधण्याचा निम्मा खर्च उद्योगपति देतात आणि निम्मा सरकार देतें. देशांतील घरांची टंचाई लक्षांत घेतां बांधण्यांत आलेलीं घरें अतिशय अपुरीं आहेत हें स्पष्टच आहे. घरटंचाईसंबंधीं गोळा करण्यांत आलेल्या माहितीप्रमाणें शहरांतील ६० टक्के लोक व ग्रामीण भागांतील ८० टक्के लोक घाणेरडया जागांतून अगर राहण्यास अयोग्य अशा जागांतून राहात आहेत. दिल्ली, मुंबई, कलकत्ता, नागपूर आणि सिमला ह्या मोठ्या शहरांतून सरकारी नोकरांनासुद्धां राहण्याची जागा मिळणें कठीण झालेलें आहे. कारण, ह्या शहरांतून मिळून ८९,५७२ घरांची टंचाई आहे. खुद्द दिल्लींतच ६३,७२६ घरांची तांतडीची गरज आहे. घरटंचाईच्या प्रश्नानें सर्व देशभर केवढें गंभीर स्वरूप धारण केलें आहे तें ह्यावरून स्पष्ट होतें.

## फळांच्या भुकट्यांचा सहकारी कारखाना

महाराष्ट्रांतील जळगांव येथें फळांपासून टिकाऊ पदार्थ तयार करण्याचा एक सहकारी कारखाना चालविण्यांत येत आहे. ह्या कारखान्यांत केळीं, आंबे आणि पपई ह्या फळांच्या टिकाऊ भुकट्या प्रयोग म्हणून तयार करण्यांत आल्या आहेत. ह्या भुकट्या समाधानकारक असून चांगल्या साधल्या आहेत. भुकट्यांचे कांहीं नमुने परदेशांत पाठविण्यांत आले असतां तेथेंहि ते प्रिय झाले आहेत. पांच परदेशांकडून भुकट्यांना मागणी आलेली आहे. शिवाय भारतामधील अनेक ठिकाणांहूनहि विचारणा करण्यांत येत आहेत. सहकारी कारखान्यानें बनविलेल्या ह्या भुकट्या उत्तम असल्याचा अभिप्राय एका जर्मन कंपनीनें व्यक्त केला आहे. आंब्याची भुकटी आणि केळ्याची भुकटी अथवा पीठ ह्यांचा स्वाद चांगला टिकूं शकतो असें दिसून आलें आहे. सर्व भुकट्यांचा रंग आणि मूळची चव दोन वर्षांपेक्षाहि अधिक काल टिकून राहतात असा अनुभव आला आहे. कांहीं खाद्य-पदार्थांना रंगरूप आणण्यासाठी कृत्रिम रंग वापरण्यांत येतात. त्यांच्या ऐवजीं अशा प्रकारच्या फळांच्या भुकट्या वापरण्यांत आल्या तर तें आरोग्यदृष्ट्या हितप्रदच ठरणार आहे. चॉकोलेट, आइसक्रीम, बिस्किटासारखे पदार्थ, टॉफी, इत्यादि खाद्यपदार्थांत स्वादासाठी त्यांचा वापर करतां येईल. लहान मुलांना लागणारे खाद्यपदार्थ म्हणूनहि त्यांचा उपयोग होऊं शकेल. पपईची भुकटी तर औषधी म्हणूनहि समजली जाते. आंबा आणि पपई ह्यांची भुकटी तयार करण्याचा हा जगांतील पहिलाच प्रयोग आहे असें म्हणतात. प्रयोग यशस्वी झाल्यास भारताला परदेशीय चलन मिळण्याचें एक नवीन साधन मिळेल.

## हुंडीवर १८% आकारण्याची मुभा—श्रॉफ्सची मागणी

मुंबई येथील शिकारपुरी श्रॉफ्स असोसिएशनचे सभासद हे लहान व्यापारी आणि वर्कशॉपवाले ह्यांना अल्प मुदतीचीं कर्जें हुंड्यांच्या तारणावर देत असतात. श्रॉफ्सना तारणावरील कर्जावर ९% आणि बिगर तारणाच्या कर्जावर १२% व्याज आकारण्याची कायद्याची मुभा आहे. हे कमाल दर १९५२ सालीं निश्चित करून देण्यांत आले, त्या वेळीं बँक रेट $3\frac{1}{2}\%$ होता आणि शेड्यूल्ड बँका $4\frac{1}{2}\%$ दरानें हुंड्या डिस्कौंट करीत असत. तेव्हांपासून बँक रेट वाढत गेला आहे; आतां तो ६% असून हुंड्यांच्या डिस्कौंटिंगचा दर $9\frac{1}{2}\%$ झाला आहे. मिळा-वयाच्या कर्जावरील व्याजाचा दर आणि दिलेल्या कर्जावर आकारावयाच्या कर्जाचा दर ह्यांतील तफावत वाढून ती शेड्यूल्ड बँकांच्या बाबतींत ३·४% वरून ५% वर गेली आहे, तर श्रॉफ्सच्या बाबतींत ती $2\frac{1}{2}\%$ ते $3\frac{1}{2}\%$ आहे. व्यापारी बँकांकडून ज्यांना सामान्यतः कर्जे मिळणार नाहींत, अशांचीं कर्जें अंडरराइट करून त्यांना कर्जें उपलब्ध करून देण्याची कामगिरी श्रॉफ्स करीत आहेत. बँकांच्या कर्जपुरवठ्यावरच श्रॉफ्स बहुंशीं अवलंबून असतात. बँका त्यांना ८% दर आकारतात; तो लवकरच ९% होण्याचा संभव आहे. त्यामुळें, त्यांना द्याव्या लागणाऱ्या आणि मिळणाऱ्या व्याजाच्या दरांतील कूस ३% पेक्षा कमी होत आहे. बँकांपेक्षा आम्हीं जास्त धोका पत्करतों आणि म्हणून आम्हांस निदान ६% मार्जिन पाहिजे, असें श्रॉफ्सचें म्हणणें आहे. बिगर-तारणावरील कर्जावर आपल्याला १८% व्याज आकारण्याची मुभा असावी अशी शिकारपुरी श्रॉफ्स असोसिएशनची मागणी आहे.

## रशिआंतील शेती सुधारण्याचा कार्यक्रम

रशिआंतील माजी पंतप्रधान गेल्या ऑक्टोबरमध्यें पदच्युत झाले. त्या वेळीं त्यांच्या सहकाऱ्यांनीं त्यांच्यावर केलेल्या आरोपांत शेती सुधारणेच्या चुकीच्या कार्यक्रमाला प्रोत्साहन देण्याचा एक आरोप होता. रशिआंतील नव्या राजवटीनें शेती सुधारणेचा नवा कार्यक्रम हातीं घेऊन मागील चुका दुरुस्त करण्याचा प्रयत्न चालविला आहे. नव्या सुधारणांचा तपशील जाहीर झालेला नसला तरी त्या बऱ्याच दूरगामी आहेत, अशी बोलवा आहे. रशिआंतील शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनापैकीं ठराविक हिस्सा सरकारला सक्तीनें विकावा लागतो; मग त्या शेतकऱ्यांची संघटना

कशाहि प्रकारची असो. नव्या सुधारणांप्रमाणें शेतकऱ्याला सध्यांपेक्षा १॥ पटीने अधिक माल सरकारला विकतां येईल. शेतीची सुधारणा करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना चांगली यंत्र-सामग्री अधिक प्रमाणांत उपलब्ध करून देण्यासाठी ७,१०० कोटी रूबलसची गुंतवणूक करण्यांत येणार आहे. युद्धोत्तर कालांत रशिआनें शेतींत जी गुंतवणूक केली तितकी ही गुंतवणूक आहे. शेतीच्या मालाची सरकारमार्फत जी खरेदी करण्यांत येते ती दीर्घकालीन कार्यक्रम आंखून करण्यांत यावयाची: आहे. त्यामुळें शेतकऱ्यांना त्यांच्या मालाच्या विक्रीबाबत वाटणारी चिंता कमी होते व उत्पादन वाढविण्यास त्यांना हुरूप वाटतो असें सांगण्यांत येत आहे. शेतीच्या उत्पादनांत वाढ होण्यासाठी शेतकऱ्याला प्रोत्साहन देण्यांत आलें पाहिजे व त्याचबरोबर शेतीविषयक कार्यक्रमाची आंखणी अधिक चांगल्या तऱ्हेनें करण्यांत आली पाहिजे, असे विचार रशिअन कम्युनिस्ट पक्षाचे पुढारी मि. ब्रेझनॉव्ह ह्यांनीं व्यक्त केले आहेत.

---

### बद्रीनाथाची यात्रा मोटारींनें करण्याची सोय

'काशीस जावें नित्य वदावें' ह्या म्हणींत वाहतुकीच्या सुखकारक साधनांच्या अभावीं यात्रा करण्यांतील अडचणी प्रतिबिंबित झालेल्या आहेत. पण आतां काशीच काय, पण हिमालयांत १० हजार फुटांवर असलेलें बद्रीनाथाचें क्षेत्रहि मोटारींच्या चाकांनीं जवळ आणलें आहे. हृषिकेश आणि बद्रीनाथ ह्यांना जोडणाऱ्या रस्त्याचा शेवटचा टप्पा पुरा करण्यांत आला आहे. त्यामुळें बद्रीनाथाची यात्रा करणें आतां सोपें झालें आहे. यात्रा करण्याची हिंदी लोकांची मनोवृत्ति अद्याप फारशी कमी झालेली नाहीं, त्यामुळें बद्रीनाथाची कांहींशी अवघड यात्राहि दरसाल सुमारें १ लाख लोक करीत असत. आतां मोटारीचा थेट रस्ता झाल्यामुळें बद्रीनाथाची यात्रा करणाऱ्या लोकांत खूपच वाढ होणार आहे. देवळाच्या चालकांचा असा अंदाज आहे कीं, दरसाल ४ लाख लोक बद्रीनाथाचें दर्शन घेण्यासाठी येऊं लागतील. परंतु यात्रिकांच्या संख्येंत इतकी वाढ झाल्यास त्या सर्वांची सोय तेथें लागणें शक्य होणार नाहीं. तेथील धर्मशाळांच्या संख्येंत गेल्या कित्येक वर्षांत नवी भर पडलेली नाहीं. पैशाच्या अभावीं यात्रेकरूंना आसरा देणारीं निवासस्थानें बांधण्याचें काम उत्तर प्रदेश सरकारला योग्य प्रमाणांत पार पाडतां आलेलें नाहीं. उत्तर प्रदेशाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मंत्र्यांनीं ह्या कामासाठी लोकांकडे देणग्यांची मागणी केलेली आहे. त्यांतच अलीकडे ह्या गांवावर एक आपत्ति कोसळली. गांवाच्या नजीकचा एक कडा तुटून कोसळला आणि त्याच्या आघातानें बरींच घरें आणि धर्मशाळा ह्यांची पडझड झाली. परिणामीं, राहण्याच्या जागा होत्या त्या त्यापेक्षाहि कमी झाल्या आहेत.

---

### अन्नधान्याचें उत्पादन वाढविणें शक्य

जपानचे भारतामधील वकील मि. इतागाकी ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, भारताला अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्णच काय पण अन्नधान्याची निर्यात करतां येणें शक्य आहे. मात्र त्यासाठी थोडी अधिक काळजी घेतली पाहिजे. भारतांत शेतीची साधनसंपत्ति विपुल आहे. तिचा फायदा घेऊन आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें शेती केल्यास शेतीचें उत्पादन वाढविण्याचा प्रश्न सहज सुटूं शकेल. जपानी पद्धतीचीं आणखी ४ नमुनेदार शेतें भारतांत स्थापन करण्यांत येणार आहेत. ह्या शेतांतून आधुनिक पद्धतीच्या शेतीचें शिक्षण देऊन लोक तयार करण्यांत येतील.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
### मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी : |
|---|---|
| ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई | महाल : नागपूर. |
| टेलिफोन नं. २५५४७४–७५, | तारेचा पत्ता : |
| २५६२१४ २५४७८१ | फार्मर बँक |

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शींव (१२) माटुंगा (१३) अंधेरी.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ५,००,४३,००० |
| गंगाजळी व फंड | ... | १,४४,७४,००० |
| ठेवी | ... | ३०,९०,२५,००० |
| खेळतें भांडवल | ... | ७९,७७,६७,००० |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

वा. यु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर.  वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

"चिरमुले निकेतन", १४३/१४६ भवानी पेठ

सातारा–शहर

*दि. १८-२-६५ पासून ठेवींवरील व्याजाचे दरांत खालीलप्रमाणें वाढ झालेली आहे.*

### मुदतीच्या ठेवी

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शें. | ६=२५ |
| २ वर्षें | ,, | ६=५० |
| ३ वर्षें | ,, | ६=७५ |
| ५ वर्षें | ,, | ७=२५ |
| ७ वर्षें | ,, | ७=५० |
| ९ वर्षें व जास्त | ,, | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खातें:—दि. १–२–६५ पासून ४ टक्के

*तसेंच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याहि शाखेंत अधिक माहिती मिळूं शकेल.

**१९६२–६३ मधील सहकारी संस्थांचा संसार**
**( आंकडे लक्ष रुपयांचे )**

| सोसायटींचा प्रकार | संख्या | सभासद (हजार) | सेळतें भांडवल | दिलेलीं कर्जे | मालाची किंमत | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | घेतला किंवा उत्पादन केला | विकला |
| १ सर्व सोसायट्या | ३,४६,१७४ | ४,२७,९५ | १७,६९,०४ | ४,९५,३९ | ३,४३,३६ | ५,६७,७५ |
| २ पतपेढ्या | | | | | | |
| अ अल्प मुदत | | | | | | |
| १ राज्य सहकारी बँका | २१ | २४ | २,८१,५१ | २,९४,८२ | — | — |
| २ मध्यवर्ती सहकारी बँका | ३८६ | ३९९ | ४,००,१२ | ४,४०,५६ | — | — |
| ३ प्राथमिक पतपेढ्या | | | | | | |
| अ ) शेतीच्या | २,११,१३२ | २,१७,३५ | ३,७०,०३ | २,५७,३० | ५५,१२ | ६२,७७ |
| ब ) धान्य बँका | ९,०८३ | १२,८३ | ७,०० | ३,०८ | — | — |
| क ) बिगर शेतीच्या | ११,८५० | ५५,०३ | १,८५,३२ | १,६६,२१ | ४,२० | ४,५० |
| ब दीर्घ मुदत | | | | | | |
| १ मध्यवर्ती जमीन गहाण बँका | १९ | ३,७३ | ८५,८५ | २४,६२ | — | — |
| २ प्राथमिक जमीन गहाण बँका | ५७१ | १०,५१ | ५५,०२ | १९,१९ | — | — |
| ३ नॉन क्रेडिट सोसायट्या | १,१२,११२ | १,२४,२७ | ३,८४,१९ | ६१,३६ | २,८४,०४ | ५,००,४८ |

**दंडकारण्य वसाहतीला मदत**—पूर्व पाकिस्तानांतून आलेल्या निर्वासितांची सोय लावण्यासाठी उभारण्यांत येत असलेल्या दंडकारण्य वसाहतीला डेन्मार्ककडून ३ कोटी रुपयांची मदत देऊं करण्यांत आली आहे. मदतीचा उपयोग करून एक गोळवाडा, कोंबड्या पाळण्याचें एक केंद्र आणि लाकूडकामाचा एक कारखाना उभारण्यांत येणार आहे. मदतीचा तपशील ठरविण्यासाठी कांहीं डॅनिश तंत्रज्ञ लवकरच येणार आहेत.

**भारतामधील जमिनीचा उपयोग**—भारताच्या एकूण क्षेत्रफळापैकी ४६ टक्के जमीन लागवडीखालीं आणण्यांत आली. १२ टक्के जमीन रस्ते आणि शहरें ह्यांनीं व्यापलेली आहे आणि बाकीची जमीन जंगल आणि गुरचराईचीं रानें म्हणून उपयोगांत आणली जात आहे. भारताच्या शेती व अन्नखात्याला तीन अमेरिकन तज्ज्ञांनीं सादर केलेल्या अहवालांत ही माहिती देण्यांत आली आहे.

**शिवणयंत्रांना स्पर्धा**—सीरिआ या देशाला भारताकडून निर्यात होणाऱ्या शिवणाच्या यंत्रांची संख्या घटत चालली असुन चिनी यंत्रांची संख्या मात्र वाढत आहे. भारताच्या शिवणाच्या यंत्रांत वापरण्यांत येणारें लांकूड कमी प्रतीचें असल्यामुळें त्याला तडे जातात. जपानचीं यंत्रेंहि तेथें अतिशय लोकप्रिय झालीं आहेत. कारण, त्यांचें लांकूड उत्कृष्ट दर्जाचें असतें.

**मोटारींच्या उत्पादनांत वाढ**—१९६४ सालामध्यें भारतामधील प्रवासी मोटारींचें उत्पादन ४८ टक्क्यांनीं वाढलें. १९६३ सालीं एकूण १५,७११ गाड्यांचें उत्पादन झालें होतें. १९६४ सालीं २३,२२६ गाड्यांचें उत्पादन झालें. मोटारगाड्यांतील देशी बनावटीच्या भागांचें प्रमाणहि वाढलें. ॲम्बॅसडर गाडींतील देशी भागांचें प्रमाण ७८ टक्क्यांवरून ८३ टक्क्यांपर्यंत आलें, फियाट गाडींतील प्रमाण ६४ पासून ७० टक्क्यांपर्यंत वाढलें आणि स्टँडर्ड गाड्यांतील प्रमाण ६० टक्क्यांवरून ७० टक्क्यांपर्यंत वाढलें.

**व्यापारी प्रदर्शनांत भाग**—१९६५–६६ सालांत भारत ११ आंतरराष्ट्रीय व्यापारी प्रदर्शनांत भाग घेईल अगर तीं भरविण्यांत पुढाकार घेईल. हीं प्रदर्शनें पश्चिम जर्मनी, हंगेरी, पोलंड, झेकोस्लोव्हाकिआ आणि पूर्व जर्मनी ह्या देशांतून भरविण्यांत येणार आहेत. कांहीं महत्त्वाच्या परदेशांतून व्यापारी केंद्रें स्थापन करण्याचेंहि भारताच्या व्यापार खात्यानें ठरविलें आहे.

**हिंदी चित्रपटांवर बहिष्कार**—इंडोनेशिआच्या मध्यवर्ती चित्रपट वितरक संघटनेनें भारतीय चित्रपटांवर बहिष्कार घालण्याची धमकी दिली आहे. इंडोनेशिआ व मलेशिआ ह्यांच्यांतील भांडणांत भारत मलेशिआची बाजू घेतो. त्यांतून ही धमकी उद्भवली आहे. इंडोनेशिआ भारताकडून दरसाल ६० चित्रपटांची आयात करीत असतो.

**काळा पैसा असणाऱ्यांना सवलत**—मध्यवर्ती अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं १९६५–६६ चें अंदाजपत्रक सादर करतांना दडवलेला पैसा असणाऱ्यांनीं तो स्वतःहून उघडकीस आणल्यास सवलती देऊं केल्या होत्या. असा पैसा ३१ मार्चपूर्वी कबूल केल्यास करांची रक्कम ५७ टक्क्यांपर्यंत भरावी लागणार होती. नाहींतर ६० टक्क्यांपर्यंत कर द्यावे लागणार होते. ह्या सवलतीचा फायदा घेऊनच पश्चिम बंगालच्या प्राप्तिकर खात्याकडे २ कोटी रुपये काळा पैसा जाहीर करण्यांत आला आहे.

**एंजिनिअरिंग कॉलेजांना मदत**—भारतामधील एंजिनिअरिंग कॉलेजांना मदत देऊन त्यांचा विस्तार करण्याच्या कामीं रशिआ आस्था दाखवीत आहे. मुंबईमध्यें रशिआच्या मदतीनें काढण्यांत आलेल्या तांत्रिक शिक्षण संस्थेच्या धर्तीवर निरनिराळ्या राज्यांतील एंजिनिअरिंग कॉलेजांचा विकास करण्याची रशिआची इच्छा आहे. तांत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रांत भारताशीं सहकार्य करण्याची तयारी रशिआनें दाखविली असून त्यासंबंधीं उभयता देशांच्या शिक्षणखात्यांचा परस्परांशीं विचारविनिमय चालू आहे.

## " मॅनेजिंग एजन्सी पद्धति रद्द करूं नका "

### " उद्योगधंदे खुंटतील "

हिंदी उद्योगधंद्यांवर, विशेषतः कपास कापडाच्या गिरण्यांवर मॅनेजिंग एजन्सीची पद्धत रद्द करण्याचा परिणाम अनिष्ट होईल, असें मत इंडिअन कॉटन मिल्स फेडरेशननें व्यक्त केलें आहे. मॅनेजिंग एजन्सी चौकशी कमिटीकडे फेडरेशननें आपलें निवेदन पाठविलें आहे. त्यांत मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीला प्रोत्साहनाची आवश्यकता आहे, असें म्हटलें आहे. १९६३ मध्यें १४८·५ कोटी रु. वसूल भांडवलाच्या ४१३ मिल कंपन्या होत्या, त्यांपैकी २३५ कंपन्या मॅनेजिंग एजन्सीजच्या कारभाराखालीं होत्या आणि त्यांचें वसूल भांडवल १०० कोटी रु. म्हणजे सर्व कंपन्यांच्या मिळून वसूल भांडवलाच्या ७०% होतें. १९५६ चा कंपन्यांचा कायदा अमलांत आल्यानंतर, १९५६ ते १९६३ ह्या सात वर्षांच्या काळांत, ७·७ कोटी रु. वसूल भांडवलाच्या ४३ मिल कंपन्या अस्तित्वांत आल्या. त्यांपैकी फक्त १३ कंपन्या (३०%) मॅनेजिंग एजन्सीखालच्या होत्या. पण त्यांचें वसूल भांडवल मात्र ४८% होतें. ह्याचा अर्थ, मॅनेजिंग एजंटसना भांडवल उभारणें अधिक सोपें जातें आणि मॅनेजिंग एजन्सी पद्धत बंद केल्यानें पोकळी निर्माण होऊन त्याचे परिणाम जाचक होतील. सध्यां, गिरण्यांच्या धंद्यांत भांडवलाच्या गुंतवणुकीस अधिकाधिक प्राधान्य द्यावें लागत आहे आणि त्यासाठी व्यवस्थापनाच्या बाबतींत ज्यास्त ज्यास्त नैपुण्य आणि सातत्य ह्यांची गरज आहे. मॅनेजिंग एजन्सीची पद्धत हेंच त्याला उत्तर आहे, असा फेडरेशनच्या निवेदनाचा सारांश आहे.

---

### नोकराच्या अपहारामुळें फर्मचें झालेलें नुकसान करपात्र नाहीं

मेसर्स कोठारी अँड सन्स, मद्रास, ह्यांच्या नोकरानें १९५५–५६ मध्यें अफरातफर करून ४२,७१६ रु. चा अपहार केला. तेवढें त्या फर्मचें नुकसान झालें. करपात्र प्राप्तीमधून ही रकम वजा घालण्यांत यावी, असें फर्मचें म्हणणें होतें. फर्मच्या नेहमींच्या व्यवहारांत आलेलें हें नुकसान नाहीं; सेरीज फर्मनें संबंधितांकडून प्रॉमिसरी नोटा लिहून घेतलेल्या आहेत. म्हणून इन्कम टॅक्स अधिकाऱ्यानें फर्मचें म्हणणें ऐकलें नाहीं. वरिष्ठांकडे करण्यांत आलेलें अपीलहि फेटाळण्यांत आलें. मद्रास हायकोर्टाच्या डिव्हिजन बेंचनें, " नोकरानें अफरातफर केल्यामुळें होणारें नुकसान फर्मच्या प्राप्तिकरास पात्र होणार नाहीं " असा निवाडा केला. नोकरानें पैशाचा अपहार केला, तर तो फर्मच्या धंद्यांतीलच एक घटना होय. नोकरांवर पैशांच्या वसुलीसाठी दिवाणी दावा लावणें निरर्थक व खर्चाचें ठरणार आहे, असें फर्मला वाटलें, तर असा दावा लावणें त्या फर्मवर बंधनकारक नाहीं. फर्मनें दावा लावला नाहीं, म्हणून केवळ फर्मनें नुकसान भरून काढण्याचा प्रयत्नच केला नाहीं, हा युक्तिवाद समर्थनीय नाहीं.

मेसर्स कोठारी अँड सन्स ह्यांनीं ४२,७१६ रु. च्या अपहाराची उत्पन्नांतून वजावट मागितली होती, परंतु नोकरानें ३४,३९६ रु. चा अपहार कबूल केला होता. म्हणून, हायकोर्टानें ह्या कबुली-पुरतीच सूट दिली.

---

### मुंबईमधील १७,३९८ झोपड्या १९६४ मध्यें पाडल्या

म्युनिसिपालिटीच्या अधिकाऱ्यांनीं १९६४ मध्यें बृहन्मुंबईतील १७,३९८ झोपड्या पाडल्या. त्यांत ८५ हजार लोक राहात होते, त्यांपैकी सुमारें २०,१५० लोकांची दुसरीकडे सोय करण्यांत आली.


# कण आणि क्षण

लेखकः—श्री. वा. काळे


तिसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली !

पृ. सं. १६०. किं. रु. ३=५०

व्हीनस प्रकाशन,

३८१ क, शनिवार पुणें २.

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले " विजय " नांगर वापरा. ४, ६ व ८ बैली फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्



१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

## स्वस्तिकचा माल निर्यात होऊं लागला

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. १ कोटी, १ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३,८१,४८५ |
| कामगारांची संख्या | १,२०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,२०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स्—प्रेशर होजेस

ग्लोव्हज—इरेझर्स—ऑईल सील्स

व

स्वरूप केबल्स

# स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.

स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.

( टेलिफोन नं. : ५५२०१ )

**भारत रस्ता बांधून देणार**—नेपाळमधील ६०० मैल लांबीच्या पूर्वपश्चिम दिशेनें जाणाऱ्या रस्त्याचा बराच मोठा भाग बांधून देण्याची तयारी भारतानें दाखविली आहे. रस्ता बांधण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री अमेरिकेकडून मिळणार आहे. ह्या रस्त्यापैकी कांहीं भाग बांधून देण्याचें आश्वासन चीननें नेपाळला दिलें होतें; परंतु नंतर चीननें हें व इतर कांहीं विकासाचीं कामें करण्याचें नाकारलें आहे.

**भाजलेल्या रोग्यांसाठीं प्लॅस्टिकच्या पिशव्या**—बर्मिंग-हॅम येथील भाजलेल्या रोग्यांच्या इस्पितळांतील कांहीं फार भाजलेल्या लोकांना ३ आठवडेपर्यंत प्लॅस्टिकच्या पिशव्यांतून ठेवण्यांत आलें होतें. हवेंतील रोगजंतूंचा जखमांत प्रवेश होऊं नये म्हणून ही खबरदारी घेण्यांत आली होती. पहिल्या कांहीं दिवसांत जखमा विषारी होण्याची अधिक भीति असते. झिपच्या सरकत्या पट्ट्यांनीं हवाबंद होणाऱ्या ह्या पिशव्यांची किंमत ६५ ते २०० रुपयांपर्यंत असते.

**बुद्धाच्या निवासस्थानाचा विकास**—बिहारमधील राज-गीर हें ठिकाण इतिहासांत बुद्धाचें निवासस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. बिहार सरकारनें ह्या स्थानाचा विकास करण्याचा मोठा कार्यक्रम आंखला आहे. हें स्थान बुद्धाच्या वास्तव्यानें पुनीत झालेलें तर आहेच, पण तें निसर्गरमणीयहि आहे. तेथील उष्णो-दकाचे झरे प्रसिद्ध आहेत. भारतांत येणाऱ्या परदेशीय प्रवाशांनीं भेट देण्यासारखें हें एक स्थान आहे.

**स्त्री-अधिकाऱ्यांसाठीं कॉलेज**—नॅशनल कॅडेट कोअर-मधील अधिकाऱ्यांना शिकवून तयार करण्यासाठीं ग्वाल्हेर येथें एक कॉलेज काढण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. आतां-पर्यंत कामटी येथील शाळेंत आणि पुरंदर किल्ल्यावरील केंद्रांत त्यांच्या शिक्षणाची सोय होती. परंतु वाढत्या संख्येमुळें ह्या कामासाठीं स्वतंत्र कॉलेजच काढण्याची आवश्यकता अलीकडे वाटूं लागली होती. ह्या कॉलेजमधील पहिला अभ्यासक्रम लवकरच सुरू होणार आहे.

**प्रवाशांसाठीं विलासी निवासस्थान**—त्रिवेंद्रम कॉर्पोरेश-ननें शहरांत येणाऱ्या हौशी प्रवाशांची राहण्याची सोय करण्या-साठीं एक प्रशस्त व सुखसोयींनीं युक्त असें हॉटेल बांधण्याचें ठरविलें आहे. हॉटेलची इमारत बांधण्यासाठीं २५ लाख रुपये लागतील. ती अनेकमजली असेल. इमारत बांधण्यासाठीं सर-कारकडे कर्जाची मागणी करण्यांत येणार आहे. पण तें न मिळा-ल्यास कॉर्पोरेशन सार्वजनिक कर्ज काढणार आहे.

**राजस्थानमधील अणुशक्ति केंद्र**—राजस्थानमध्यें उभार-ण्यांत यावयाच्या अणुशक्ति केंद्राचें प्राथमिक स्वरूपाचें काम सुरू करण्यांत आलें आहे. हें केंद्र उभारण्यासाठीं गेल्या वर्षीं भारत व कॅनडा ह्यांच्या दरम्यान करार करण्यांत आला आहे. केंद्रांत वीज उत्पन्न करणारा एकच उत्पादक प्रथम उभारण्यांत येईल. तो २ लाख किलोवॅट वीज निर्माण करूं शकेल.

**भारतीय लेखकांचीं चरित्रें**—भारताच्या विविध भाषांतील २०० प्रसिद्ध लेखकांचीं चरित्रें प्रसिद्ध करण्याची एक योजना साहित्य ॲकॅडमी तयार करीत आहे. अर्वाचीन व प्राचीन अशा दोन्ही लेखकांचीं चरित्रें प्रसिद्ध करण्यांत यावयाचीं आहेत. ह्या चरित्र ग्रंथांचीं सर्व प्रादेशिक भाषांतून भाषांतरेंहि करण्यांत याव-याचीं आहेत. भारतामधील भाषिक गटांचीं एकमेकाला ओळख होण्यासाठीं आणि त्यांच्यांत अधिक समरसता निर्माण करण्याच्या उद्देशानें योजनेचा उपक्रम हातीं घेण्यांत येत आहे.


ठाकरसी फॅब्रिक्स

-फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती; सॅन्फोराइज्ड कापड ·SANFORIZED·

रंगदार, रम्य, कमालीचे मोहक
भारी पोत नी टिकाऊ दर्जा हेच त्याचे गमक


THACKERSEY FABRICS

ठाकरसी ग्रुप ऑफ मिल्स •दी [illegible] स्पिनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.
•दी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि., •दी हिंदुस्तान स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल्स कं. लि.




BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

*Make doubly sure by fitting*



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

**मद्यपान आणि स्त्रिया**—भारतांत मद्यपान हें अजूनहि बऱ्याच अंशीं पुरुषांपुरतेंच मर्यादित राहिलेलें आहे. परंतु दिल्ली येथील मद्यपानासंबंधीं करण्यांत आलेल्या एका पाहणींत असें आढळून आलें कीं वरिष्ठ वर्गांतील सरकारी नोकरांच्या पत्नी, सुखवस्तु, उद्योगधंदेवाल्यांच्या पत्नी आणि नोकरी करणाऱ्या स्त्रिया ह्यांच्यामध्यें मद्यपानाचा प्रसार झालेला आहे. मद्यप्राशन करणारा स्त्रियांचा दुसरा गट गलिच्छ वस्त्यांतून आढळून आला.

**अधिक मुदतीचे परवाने**—सध्यां घरगुती वापरासाठी उपयोगांत आणल्या जाणाऱ्या रेडिओंचे परवाने दरसाल नव्यानें काढावे लागतात. एका वर्षापेक्षा अधिक मुदतीचे परवाने देण्यांत यावेत अशी मागणी करण्यांत येत होती. सरकारनें ती स्वीकारली असून चालू वर्षाच्या मध्यापासून ५ वर्षांपर्यंतचे मुदतीचे परवाने देण्यांत येणार आहेत. एका वर्षापेक्षा अधिक मुदतीचे परवाने घेणाऱ्यांना फींत कांहीं सवलतहि देण्यांत येणार आहे.

**कालिदासस्मृति तिकिटांची कहाणी**—कालिदासाच्या स्मृतीप्रीत्यर्थ जून १९६० मध्यें रु. १·०३ किंमतीचीं पोस्टाचीं १·४६ कोटी रु. चीं तिकिटें विक्रीस काढण्यांत आलीं, त्यांपैकी १·२७ कोटी रु. चीं तिकिटें अद्याप पडून आहेत. ह्या किंमतीच्या तिकिटांचा उपयोग परदेशांकडे पत्रांवर लावण्यासाठीच होता; १९६०–६१ पूर्वी त्याचें हंशील रु. १·०३ होतें, आणि नेमक्या त्या किंमतीचीं तिकिटें नव्हतीं. पुढें, उरलेल्या तिकिटांवर रु. १ चा शिक्का मारण्यांत आला. त्या उद्योगाला १७ हजार रु. खर्च आला. १६ लक्ष तिकिटें खराब होऊन तीं जाळून टाकावीं लागलीं. मूळ तिकिटांच्या छपाईस साध्या एकरंगी तिकिटांच्या छपाईपेक्षा ६९ हजार रुपये जास्त खर्च आला होता.

**मद्रासमधील जागतिक प्रदर्शन**—१९६६–६७ च्या हिवाळ्यांत मद्रास येथें जागतिक व्यापार व उद्योग प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनास प्रारंभ १९६६ च्या नाताळानंतर होईल आणि ते महिनाभर चालू ठेवण्यांत येईल. प्रदर्शनांतील दालनें उभारण्यासाठी ३ कोटी रुपये खर्च येईल. प्रदर्शन अखिल भारतीय कारखानदार संघटनेतर्फे भरविण्यांत येणार असून त्यासाठी ५०० एकर जागा निवडण्यांत आली आहे.

**पाव भाजण्याच्या भट्ट्यांची देणगी**—कोलंबो मदत योजनेला अनुसरून ऑस्ट्रेलिआ भारताला पाव–बिस्किटें भाजण्याच्या ६ स्वयंचलित भट्ट्या देणगी म्हणून देणार आहे. त्यांची किंमत सुमारें २ लाख पौंड आहे. भट्ट्यांतून शाळकरी मुलांना लागणारा सकस पाव भाजण्याचीहि सोय आहे. भारतामधील पाव भट्ट्यांची पाहणी करण्यासाठी एक ऑस्ट्रेलिअन तज्ज्ञ नुकताच येऊन गेला. त्याच्या शिफारसी लक्षांत घेऊन भारत सरकारनें ह्या भट्ट्या मागविल्या होत्या. नवीन भट्ट्या दिल्ली, मुंबई, कलकत्ता, मद्रास, अर्नाकुलम् आणि अहमदाबाद ह्या शहरांतून उघडण्यांत येतील.

**बनावट औषधांचे कारखाने**—कलकत्ता येथील पोलिसांनीं बनावट औषधें तयार करीत असलेल्या गुप्त प्रयोगशाळांवर अगर कारखान्यांवर एकाच वेळीं छापा घालून अर्धवट तयार झालेलीं औषधें उघडकीस आणलीं. त्यांपैकी एक कारखाना कलकत्त्यापासून ८ मैलांवर असलेल्या एका वसाहतींत उघडकीस आला. ह्या कारखान्यांत बनावट औषधें तयार करण्यासाठी लागणारें सर्व साहित्य पद्धतशीरपणें जमविण्यांत आलेलें होतें. एका प्रसिद्ध औषध कंपनीच्या नांवाच्या बाटल्या, लोकी, इत्यादि साहित्य त्यांत होतें.

**भोंदू व भंपक वैद्यांना कडक शिक्षा**—फ्रान्सच्या वतीनें रोगनिवारण करणारे भोंदू, भंपक डॉक्टर्स, जादूटोणा करणारे मांत्रिक, इत्यादींचा फ्रान्समध्यें सुळसुळाट झालेला आहे. असे हजारों लोक फ्रान्समध्यें रोग्यांवर बेकायदा उपचार करीत आहेत. अशा लोकांना कडक शिक्षा देण्यासाठी फ्रान्सचें सरकार नवीन कायदा मंजूर करून घेणार आहे. बेकायदा उपचार करणाऱ्यांना देण्यांत येणारी शिक्षा सहा महिन्यांच्याऐवजी दोन वर्षे करण्यांत येणार आहे.

**आमदारांच्या पगारांत वाढ**—गुजरात विधानसभेनें आमदारांना मिळणाऱ्या पगारांत व भत्त्यांत वाढ करणारें बिल मंजूर केलें आहे. त्याला अनुसरून आमदारांच्या पगारांत ५० रुपयांची आणि एकत्रित भत्त्यांत ५० रुपयांची वाढ करण्यांत आली आहे. रोजच्या भत्त्यांतहि ८ रु. वाढविण्यांत आले आहेत. त्याशिवाय राज्यांतील कोठल्याहि भागांत रेल्वेनें पहिल्या वर्गांतून फुकट प्रवासाची सवलतहि त्यांना देण्यांत आली आहे.

**हिंदी पार्लमेंटसाठी पेयगृह**—पेयपानाची सोय नसलेलें जगांतील एकमेव पार्लमेंट म्हणजे भारताचें पार्लमेंट, ही गोष्ट ऑस्ट्रेलिअन सरकारच्या लक्षांत आल्यामुळें त्या सरकारनें ही उणीव दूर करण्याचें ठरविलें. पेयपानाची सोय असलेला २० फूट लांबीचा एक डागविरहित राहणारा पोलादाचा रुंद कौंटर लोकसभेला देण्यांत आला आहे. मात्र ह्या ठिकाणीं दूध, आइसक्रीम व इतर पेयेंच देण्यांत येतील.

**जमिनीचा खंड रद्द केला**—भाताच्या शेतावरील कुळांनीं मालकांना द्यावयाचा खंड रद्द करण्याचा हुकूम ब्रह्मदेशाच्या सरकारनें काढला आहे. ब्रह्मदेशांत खंडानें भातशेती करणारे सुमारें १० लाख शेतकरी असून, ते जमिनीच्या मालकांना दरसाल सुमारें २० लाख डॉलर्स खंडाच्या रूपानें देतात. आतां त्यांना हा खंड द्यावा लागणार नाहीं.

**चित्रपटाची निर्यात**—हिंदी चित्रपटांची ब्रह्मदेशाला निर्यात करण्याची शक्यता अजमावण्यासाठी भारत सरकार लवकरच एक प्रतिनिधि मंडळ त्या देशाला पाठविणार आहे. अमेरिकेला गेलेल्या हिंदी चित्रपट व्यावसायिकांच्या प्रतिनिधि मंडळाचा उपयोग होऊन एका अमेरिकन कंपनीनें एक चित्रपट भारतांत काढण्याचें ठरविलें आहे.

**यांत्रिक हत्यारांचे कारखाने**—भारत सरकारनें सार्वजनिक मालकीच्या विभागांत यांत्रिक हत्यारें तयार करण्याचे दोन कारखानें उभारण्याचें ठरविलें आहे. त्यासाठी झेकोस्लोव्हाकिआकडून मदत घेण्यात येणार आहे. त्यांपैकी एक गुजरातमध्यें आणि दुसरा राजस्थानांत काढण्यांत येईल. दोन्ही कारखान्यांच्या उभारणीसाठी एकूण १८ कोटी रुपये खर्च येईल.

**मालवाहू मोटारींची आयात**—भारतानें झेकोस्लोव्हाकिआच्या परदेशी व्यापारविभागाशीं करार करून ३० लाख डॉलर्स अथवा १·५ कोटी रुपये किंमतीच्या मालवाहू मोटारी आयात करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक मोटारींत ५ टन वजनाचा माल नेतां येईल. मोटारी जास्तींत जास्त दर तासास ७२ किलोमीटर वेगानें पळवितां येतील.

**सुताची सहकारी गिरणी**—सोलापूर येथील यंत्रमाग असोसिएशननें सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी सुताची गिरणी काढण्याचा विचार चालविला आहे. ही गिरणी सभासदांना वाजवी किंमतीनें सुताचा पुरवठा करील. गिरणीमुळें ५०० लोकांना रोजगार मिळणार आहे. सोलापुरांत काढण्यांत येणारी ही सुताची दुसरी सहकारी गिरणी आहे.

## भारतामधून निर्यात होणाऱ्या मालाची विविधता

भारत सरकारच्या परदेशांतील व्यापारी प्रतिनिधीकडून जी माहिती आली आहे त्यावरून असें दिसतें कीं, भारताकडून परदेशाला निर्यात होणाऱ्या मालांत खूपच विविधता आहे. ह्या मालांत डबाबंद मासे, चंदनी साबण, माणसाचे केंस, हस्तव्यवसायाच्या वस्तु, सुती कापड, विजेच्या मोटर्स, प्लॅस्टिकच्या वस्तु, मसाल्याचे पदार्थ, इत्यादि प्रकारचा माल आहे. डबाबंद मासे व इतर जलज खाद्यपदार्थ भारतामधून फ्रान्सला मोठ्या प्रमाणावर निर्यात करण्यांत येतात. कॅनडा देश भारताकडून सुती कापड, ताग, केस, चंदनी साबण, हस्तव्यवसायाच्या वस्तु इत्यादि माल विशेष आस्थेनें मागवितो. ह्या वस्तूंची निर्यात कॅनडांत इतर कोणत्याहि देशापेक्षा अधिक प्रमाणांत होते. इराणमध्यें विजेवर चालणाऱ्या मोटर्स तयार करण्याचा धंदाच अस्तित्वांत नाहीं. त्यामुळें इराणला आपली सर्व गरज आयातीनें भागवावी लागते. अर्थात् भारतामधील विजेच्या मोटर्स तिथें खपण्यास चांगला वाव आहे. मात्र त्यांच्या किंमती स्पर्धेत टिकण्याइतक्या कमी असल्या पाहिजेत. सध्यां पश्चिम जर्मनी, ब्रिटन, अमेरिका आणि फ्रान्स हे देश इराणची गरज मुख्यतः भागवीत आहेत. स्वीडनमध्यें भारतामधील मसाल्याच्या पदार्थांना बरीच लोकप्रियता लाभलेली आहे. युरोपमधील सर्वच देशांतून मसाल्याचे पदार्थ अधिक प्रमाणांत आयात करण्यांत येऊं लागले आहेत. ह्या पदार्थांच्या विक्रीकडे अधिक लक्ष पुरविल्यास ह्या मालाची भारताची बाजारपेठ चांगली वाढेल. सौदी अरेबिआ त्याला लागणारा प्लॅस्टिकचा माल हाँगकाँगहून आयात करतो. त्याची ही गरज भारताला भागवितां येण्यासारखी आहे.

## स्वातंत्र्य आणि शास्त्रीय संशोधन

म्हैसूर राज्याच्या वैद्यकिय संशोधन मंडळाचें उद्घाटन करतांना सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रामन् म्हणाले कीं, "भारताचें स्वातंत्र्य टिकवून धरावयाचें असेल तर शास्त्र आणि शास्त्रीय संशोधन ह्या दोन्ही क्षेत्रांत झपाट्यानें प्रगति करणें अतिशय आवश्यक आहे. शास्त्रीय संशोधनाच्या बाबतींत एक गोष्ट अशी दिसून येतें कीं, संशोधनाच्या दिशेचें तोंड लष्करी उपयुक्ततेकडे वळलेलें आहे. ही गोष्ट खेदजनक आहे. संशोधनाची प्रेरणा प्रामुख्यानें आध्यात्मिक आणि बौद्धिक असावयास पाहिजे." डॉ. रामन् ह्यांनीं आपल्या संशोधनाची व्याप्ति अलीकडे आणखी कांहीं क्षेत्रांत वाढविली आहे. शरीरव्यापारशास्त्र, संगीत आणि त्यांतील ध्वनि, ह्याहि क्षेत्रांत त्यांनीं कार्य करण्यास प्रारंभ केला आहे, अशी माहिती उद्घाटनप्रसंगीं सांगण्यांत आली.

## जपानमध्यें हिंदी पद्धतीचें हॉटेल

जपानमध्यें हिंदी पद्धतीचें एक हॉटेल स्थापन करण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. ह्याच हॉटेलमध्यें भारताचें व्यापारी व सांस्कृतिक केंद्रहि सुरू करण्यांत येणार आहे. हॉटेलमध्यें हिंदी पद्धतीचे खाद्यपदार्थ, चहा, कॉफी, काजू इत्यादि मिळण्याची सोय करण्यांत येईल. टोकिओमधील ह्याच धंद्यांतील बड्या उद्योगपतींशीं ह्या उपक्रमांत सहकार्य करण्यांत येईल. त्याचप्रमाणें भारतामधून माल आयात करणाऱ्या जपानी व्यापाऱ्यांचेंहि साह्य घेण्यांत येईल. अशा प्रकारची हॉटेल्स जपानमध्यें अनेक पाश्चात्त्य देशांनीं उघडलेलीं आहेत. अलीकडे इंडोनेशिआ व चीन ह्यांनींहि आपआपलीं हॉटेल्स स्थापन केलेलीं आहेत.

## बेकारांची संख्या अधिकच वाढणार

ग्रामीण भागांतील लोकांच्या श्रमशक्तीचा उपयोग करून घेण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी दिल्ली येथें परिषद भरविण्यांत आली होती. परिषदेंत बोलतांना नियोजन समितीचे एक सभासद श्री. त्रिलोकसिंग म्हणाले कीं, चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत २·१ कोटी नवे रोजगार निर्माण करण्यांत येतील. तरीहि कार्यक्रमाच्या अखेरीस १·५ कोटी धट्टेकट्टे लोक बेकार राहण्याची शक्यता आहे. पांचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत तर रोजगारीची परिस्थिति अधिकच बिकट होईल. कारण त्या काळांत काम करण्यास समर्थ अशा ३ कोटी लोकांची रोजगार शोधणाऱ्यांत भर पडेल. म्हणून शेतींचा हंगाम संपल्यावर बेकार राहणाऱ्या लोकांना काम देण्यासाठी जास्तींत जास्त प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत.

## यंत्रसामग्रीच्या उत्पादनाची प्रगति

कांहीं वर्षांपूर्वी भारतांत औद्योगिक यंत्रसामग्री बनविण्याचा उद्योगधंदा जवळजवळ नव्हताच म्हटलें तरी चालेल. पण आतां मात्र ती तयार करण्याच्या कामीं भारतानें बरीच प्रगति केली आहे. १९६१ मध्यें देशांत २०० कोटी रुपये किंमतीचीं औद्योगिक यंत्रें तयार करण्यांत आलीं, तर १९६४ मध्यें ३५० कोटी रुपयांचीं यंत्रें तयार करण्यांत आलीं. तरीसुद्धां भारताच्या ह्याविषयींच्या गरजा आणि देशांतील उत्पादन ह्यांच्यांत बरीच तफावत आहे. औद्योगीकरणाची गति वाढत असल्यानें यंत्रसामग्रीची गरजहि वाढलेली आहे. त्यामुळें अजूनहि दरसाल सुमारें ३०० कोटी रुपये किंमतीची यंत्रसामग्री भारताला परदेशांतून आयात करावी लागते.

## पट्टेवाल्यांच्या बिऱ्हाडांतून पंखे बसविणार

नव्या दिल्लीमधील पट्टेवाल्यांच्या बिऱ्हाडांतून पंखे बसविण्याचें वर्क्स आणि हाउसिंग खात्यानें ठरविलें आहे. चतुर्थ श्रेणीच्या सुमारें १२,००० नोकरांना ह्या पंख्यांचा वारा मिळेल.

## चेकचे पैसे मिळायला किती वेळ लागला!

'करंट' साप्ताहिकाच्या संपादकांनीं मुंबईमधील सहा प्रमुख बँकांच्या मुख्य कचेऱ्यांवर प्रत्येकी २५ रु. चे बेअरर चेक काढून त्यांची रक्कम मिळायला प्रत्येक बँकेंत किती वेळ लागतो, ह्याची पाहणी २५ मार्च रोजीं करविली. तेव्हां, बँक ऑफ इंडियांत तो चेक वटायला सर्वांत कमी वेळ लागला; युनिअन बँकेंत सर्वांत जास्त वेळ लागला. एका बँकेला जें काम करायला एकदोन मिनिटें पुरतात, त्याला दुसऱ्या बँकेलाहि तेवढा वेळ कां पुरूं नये, असा प्रश्न उपस्थित होतो. वेगवेगळ्या बँकांना चेकची रक्कम देण्यास किती वेळ लागला, तें खालीं दिलें आहे :—

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया | १½ मिनिटें |
| देना बँक | १० मिनिटें |
| सेंट्रल बँक | १४ मिनिटें |
| युनायटेड कमर्शिअल बँक | २० मिनिटें |
| नॅशनल अँड ग्रिंडले बँक | २९ मिनिटें |
| युनियन बँक | ३५ मिनिटें |

एखाद्या बँकेला एका चेकचे पैसे द्यावयास तिच्या कर्मचाऱ्यांच्या कांहीं चुकीमुळें उशीर झाला म्हणून सर्वच चेक्सचे पैसे देण्यास तिला उशीर लागतो, असा निष्कर्ष काढतां येणार नाहीं. तथापि, सहा बड्या बँकांच्या बाबतींत एवढी तफावत पडली, हें जरा आश्चर्यकारक आहे.

**बाहेर पडणारा सुवर्णप्रवाह**—अमेरिकेंतून बाहेर जाणारा सोन्याचा प्रवाह अद्याप चालूच आहे. अलीकडे २५ कोटी डॉलर्स किमतीचें सोनें परदेशीं गेलें आहे. फ्रान्सनें डॉलर्सचें सोन्यांत रूपांतर करण्याचें ठरविल्यामुळें अमेरिकेच्या सुवर्णसंचयांत मुख्यतः घट होत आहे. फ्रान्सचे अध्यक्ष द गॉल ह्यांनीं जाहीर केलेल्या कार्यक्रमाप्रमाणें फ्रान्सनें ह्या वर्षी ४८·२५ कोटी डॉलर्सचे सोन्यांत रूपांतर करून घेतलें आहे.

**रेल्वे एंजिनांसाठीं कर्ज**—अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विकास मंडळानें हिंदच्या रेल्वेखात्याला ३८ लाख डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. कर्जाचा उपयोग करून २१ डिझेल विजेचीं एंजिनें खरेदी करण्यांत येणार आहेत. कर्जाची मुदत ४० वर्षांची आहे. पहिल्या ३० वर्षांत २॥ टक्के दरानें व्याज घेण्यांत येणार आहे. उरलेल्या १० वर्षांत १ टक्का दरानें व्याज द्यावें लागेल.

**भांडवल गुंतवणूक आणि दक्षिण भारत**—भारतांत भांडवल गुंतविण्यास कितपत वाव आहे तें अजमावण्यासाठी एक अमेरिकन प्रतिनिधि मंडळ भारतांत आलें होतें. मंडळाच्या पुढाऱ्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, भारत-अमेरिका संयुक्त औद्योगिक संघटना उभारण्यासाठी दक्षिण भारत अधिक चांगला आहे. कच्च्या मालाची उपलब्धता, लोकांचें शिक्षण, कुशल कामगार आणि धंद्यांतील अनुभव ह्या दृष्टीनें त्यांनी हा अभिप्राय व्यक्त केला.

**भारताला वांचविण्याची हांक**—भारताच्या बिघडत जाणाऱ्या परिस्थितींतून त्या संडप्राय देशांत क्रांतीचा स्फोट होण्याची शक्यता आहे. म्हणून प्रमुख पाश्चात्त्य देशांनीं व जपाननें भारताला अधिकांत अधिक मदत करावी असा आग्रह अमेरिका करीत असल्याची वार्ता आहे. भारत मदत मंडळाच्या बैठकीच्या निमित्तानें ह्या आग्रहाला चांगली धार येण्याचा संभव आहे. भारत मदत मंडळाकडून १२० कोटी डॉलर्सच्या मदतीची भारत सरकार मागणी करील असा अंदाज आहे.

**डॉक्टर्सची गळती थांबविणार**—भारतामधील वैद्यकीय शिक्षण संस्थांतून दरसाल ३ ते ४ हजार डॉक्टर्स शिकून तयार होतात. परंतु त्यांपैकीं अनेक डॉक्टर्स परदेशांत नोकरीसाठी जातात. त्यामुळें देशांत डॉक्टर्सचा तुटवडा पडतो. डॉक्टर्सच्या ह्या गळतीवर भारत सरकार लवकरच उपाय योजणार आहे. ब्रिटनच्या इस्पितळांतून आजमितीस १,००० हिंदी डॉक्टर्स काम करीत आहेत.

**डबाबंद फळांचे कारखाने**—उत्तर बिहारमध्यें फळें टिकवून धरण्यासाठी तीं डबाबंद करण्याचे तीन कारखाने काढण्यांत येणार आहेत. सर्व कारखाने सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येतील. कारखान्यांसाठी लागणाऱ्या खर्चाची सोय राज्याच्या कार्यक्रमांत करण्यांत आली असली तरी मध्यवर्ती सरकारच्या समाज-विकास खात्यातर्फेंहि त्यांना आर्थिक मदत देण्यांत येणार आहे.


दातांच्या स्वच्छतेसाठीं

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१९००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| (१) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| (२) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३॥ „ |
| (३) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर




बेडेकर

मसाले, लोणचीं व पापड

आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.

वापरून पाहा.

मुगभाट, मुंबई ४.

शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | ... | रु. १५ „ |
| ठेवी | ... | रु. ३१८ „ |
| खेळतें भांडवल | ... | रु. ४५३ „ |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.





हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.